८.३ योजनेचे नाव	सेनापती धनाजी जाधव सारथी-शेतकरी ड्रोन पायलट प्रशिक्षण कार्यक्रम २०२५-२६
योजनेची सुरुवात	सन २०२३-२४
लाभार्थी लक्षांक	८८०
योजनेचा उद्देश	सारथी लक्षित गटातील सदस्यांकरिता DGCA मान्यता प्राप्त आरपीटीओ केंद्रामध्ये ड्रोन पायलट प्रशिक्षण देणे
योजनेचे स्वरूप	तंत्रज्ञान प्रसार, निवासी प्रशिक्षण
प्रशिक्षण ठिकाण	• महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहूरी • वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी • डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली
प्रशिक्षण कालावधी/टप्पे	१. महात्मा फुले कृषि विद्यापीठ राहूरी येथील ०७ दिवसाचे ड्रोन पायलट प्रशिक्षण याकरिता प्रशिक्षण संस्थेस र.रू.३५,०००/- प्रती प्रशिक्षणार्थी व विद्यार्थ्यांना निवास, भोजन व नाष्टा याकरिता रू.४०००/- च्या मर्यादेत रक्कम अदा केली जाते याकरिता विद्यार्थ्यांनी प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर निवास, भोजन व नाष्टा यांची देयके संस्थेस स्वसाक्षांकित करून दिल्यानंतर देयके अदा केली जातात. २. डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ येथील ०७ दिवसीय स्मॉल रोटरक्राफ्ट कॅटॅगरीचे प्रशिक्षण कार्यक्रमाकरिता र.रू.३७,६२०/- आणि मिडियम रोटरक्राफ्ट कॅटॅगरीसाठी र.रू.४७,६२०/- इतकी रक्कम प्रती प्रशिक्षणार्थी विद्यापीठास अदा केली जाते. यामध्ये प्रशिक्षण शुल्क, विद्यार्थी यांचे निवास, नाष्टा व भोजन यांचा खर्च समाविष्ट आहे. ३. वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी येथील १८० दिवसाच्या प्रशिक्षण कार्यक्रमासाठी प्रती विद्यार्थी प्रशिक्षण संस्थेस र.रू.९९,०००/- अदा केली जाते. तसेच निर्वाह भत्त्याची रक्कम रूपये ८०००/- प्रती महिना प्रती विद्यार्थी त्यांचे उपस्थिती नुसार किमान ९०% उपस्थिती असल्यास अदा केली जाते. तसेच ७ दिवशीय प्रशिक्षणासाठी रु ४२०००/- प्रती प्रशिक्षणार्थी मंजूर आहे.

लाभार्थी पात्रता	या योजनेचा लाभ घेण्यासाठी लक्षित गटातील सदस्यांना sarthi-maharashtragov.in या वेबसाईटवर जाऊन अर्ज करणे आवश्यक आहे. शिक्षण - ०७ दिवसाचे प्रशिक्षणासाठी १२ पास, पदवीधर असल्यास प्राधान्य दिले जाईल आणि Professional Certificate Course on Drone Agriculture प्रशिक्षण या प्रशिक्षणासाठी विज्ञान किंवा अभियांत्रिकी शाखेची पदवी असणे आवश्यक अथवा ड्रोन पायलट प्रमाणपत्र कोर्स (RPC) • वयोमर्यादा किमान : १८ वर्षे व कमाल ५५ वर्षे. • महाराष्ट्रातील अधिवास असावा. • अर्जदार हा महाराष्ट्रातील मराठा, कुणबी, मराठा – कुणबी आणि कुणबी – मराठा या प्रवर्गातील असावा. • कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रू. ८.०० लाखापेक्षा जास्त नसावे. • सारथी, पुणे मार्फत राबविण्यात येणाऱ्या याच उपक्रमाअंतर्गत या प्रकारच्या याबाबीचा लाभ याअगोदर घेतलेला नसावा. • ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर सारथीचे विभागीय कार्यालयामार्फत आपण केलेला अर्ज आणि कागदपत्रांची ऑनलाईन तपासणी केली जाते. योजनेच्या अटी शर्ती प्रमाणे सर्व कागदपत्र जोडलेले असल्यास ऑनलाईन शिफारस करतील. • अर्जात त्रृटी असल्यास पुन:श्च आपल्याकडे पाठविण्यात येईल. • ऑनलाईन प्राप्त झालेल्या त्रृटींची पूर्तता ऑनलाईन करावी लागेल. तसेच योजनेच्या अटी शर्तींची पूर्तता होत नसल्यास अपात्र ठरविण्यात येईल. • प्रशिक्षणार्थी लाभार्थीकडे वैध पासपोर्ट / मतदार ओळखपत्र / वाहन परवाना / शिधापत्रिका असावा. • वैद्यकीय योग्यता प्रमाणपत्र असावे. (Fitness Certificate)
आवश्यक कागदपत्रे	ऑनलाईन अर्ज करताना अर्जदाराने खालील कागदपत्राची पीडीएफ करून अपलोड करणे आवश्यक आहे. अपलोड केलेली सर्व कागदपत्र सुस्पष्ट व वाचनीय असावे. • कुणबी – मराठा करिता – कुणबी व कुणबी – मराठा, जातीचा दाखला • मराठा करिता – शाळा सोडल्याचा दाखला अथवा जातीचा दाखला • उत्पन्नाचा दाखला – नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र / EWS प्रमाणपत्र / तहसिलदार यांचा मागील वर्षाचा उत्पन्न दाखला ८.०० लाख रूपयांपेक्षा जास्त नसल्याबाबतचे प्रमाणपत्र (Income Certificate) • आधार कार्ड, जन्मदाखला अथवा शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र

	• बँक अकाऊंट तपशिल • रहिवासी दाखला (Domicile Certificate) • Code of Conduct • हमीपत्र (१८० दिवस प्रशिक्षण)
लाभार्थी निवड प्रक्रिया	• लाभार्थी ऑनलाईन अर्ज भरण्याकरिता जाहीरात सारथीचे संकेतस्थळावर व राज्यातील वर्तमानपत्रामध्ये प्रसिद्ध केली जाईल. . • प्रथम येणाऱ्या पात्र अर्जदाराची निवड प्राधान्याने करण्यात येईल. • प्रशिक्षण वर्गाच्या क्षमतेनुसार लाभार्थ्यांनी प्रशिक्षणाची तारिख व निवडीबाबत कळविण्यात येईल. • कुटुंबातील जास्तीत जास्त एकाच सदस्यांची प्रशिक्षणाकरिता निवड केली जाईल. • सदर प्रशिक्षण हे मोफत राहील.
लाभाचे स्वरूप :	महात्मा फुले कृषि विद्यापीठ राहूरी येथील ०७ दिवसाचे ड्रोन पायलट प्रशिक्षण याकरिता प्रशिक्षण संस्थेस र.रू.३५,०००/- प्रती प्रशिक्षणार्थी व विद्यार्थ्यांना निवास, भोजन व नाष्टा याकरिता रू.४०००/- च्या मर्यादेत रक्कम अदा केली जाते याकरिता विद्यार्थ्यांनी प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर निवास, भोजन व नाष्टा यांची देयके संस्थेस स्वसाक्षांकित करून दिल्यानंतर देयके अदा केली जातात. १. डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली येथील ०७ दिवसीय स्मॉल रोटरक्राफ्ट कॅटॅगरीचे प्रशिक्षण कार्यक्रमाकरिता र.रू.३७,६२०/- आणि मिडियम रोटरक्राफ्ट कॅटॅगरीसाठी र.रू.४७,६२०/- इतकी रक्कम प्रती प्रशिक्षणार्थी विद्यापीठास अदा केली जाते. यामध्ये विद्यार्थी यांचे निवास, नाष्टा व भोजन यांचा खर्च समाविष्ट आहे. २. वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी येथील १८० दिवसाच्या प्रशिक्षण कार्यक्रमासाठी प्रती विद्यार्थी प्रशिक्षण संस्थेस र.रू.९९,०००/- अदा केली जाते. १८० दिवसाच्या प्रशिक्षण कार्यक्रमासाठी प्रशिक्षण कार्यक्रमाकरिता अटी व शर्ती : • सारथीमार्फत भोजन व निवास करिता र.रू.८०००/- प्रति महिना प्रती विद्यार्थी हे महिना पूर्ण होताच विद्यार्थ्यांना त्यांच्या अकाऊंट वर देय असणार आहे.यासाठी वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी यांचेकडून वेळोवेळी विद्यार्थ्यांचा महिन्याचे समाधानकारक प्रगतीअहवाल प्राप्त झालेनंतरच व कोर्स समाधानकारक रित्या पूर्ण झाल्यानंतर संबंधितांना दरमहा ८०००/- प्रमाणे रक्कम वितरित करण्यात येईल.

	• सदरचे प्रशिक्षण पूर्ण करताना आपली ९०% उपस्थिती असणे अनिवार्य आहे. तरच आपल्याला निर्वाह भत्त्याची रक्कम अदा करण्यात येईल. त्यापेक्षा कमी असल्यास निर्वाह भत्ता रक्कम अदा केली जाणार नाही. • सदरचा कोर्स हा पूर्ण करण्याची जबाबदारी विद्यार्थ्यांची असेल, तसे न करता १ महिना किंवा नंतर आपण कोर्स अर्धवट सोडून गेल्यास कोर्सची संपूर्ण फी वसूलपात्र राहील. • प्रशिक्षण सुरू झाल्यानंतर १५ दिवस जरी आपण गैरहजर राहील्यास उर्वरित कालावधीचे प्रशिक्षण पूर्ण करता येणार नसून आणि त्यानंतर इतर विद्यार्थ्यांचे आदेश निर्गमित केला जाईल. • सदर प्रशिक्षणास गैरहजर राहत असल्याबाबत न कळविल्यास पुन:श्च या प्रशिक्षणासाठी निवड केली जाणार नाही.
प्रशिक्षण संस्थेबाबत	• महात्मा फुले कृषि विद्यापीठ राहूरी ०७ दिवसाचे स्मॉल रोटरक्राफ्ट कॅटॅगरीचे प्रशिक्षण दिले जाते. • वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी १८० दिवसाचे प्रशिक्षण दिले जाते. • डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ ०७ दिवसीय स्मॉल रोटरक्राफ्ट कॅटॅगरीचे प्रशिक्षण व मिडियम रोटरक्राफ्ट कॅटॅगरीचे प्रशिक्षण दिले जाते.
अपात्रतेचे निकष	• कागदपत्रे अपूर्ण असणे व विहित मुदतीत सादर न करणे. • ऑनलाईन अर्ज भरताना खोटी किंवा चुकीची माहिती भरणे. • सारथी अंतर्गत या उपक्रमातून यापूर्वी या प्रशिक्षणाचा लाभ घेतलेला असल्यास. • वयोगटात बसत नसल्यास नियमांचे उल्लंघन केल्यास
लाभार्थी संख्या २०२३-२४ ते २०२४-२५	३११ - ०७ दिवसीय प्रशिक्षण २४ - १८० दिवसीय प्रशिक्षण

डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ दापोली येथे ड्रोन पायलट प्रशिक्षण घेताना सारथीचे विद्यार्थी

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणी येथे १८० दिवसाचे ड्रोन पायलट प्रशिक्षण घेताना सारथीचे विद्यार्थी